


सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on




E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १७२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. १३ ऑगस्ट २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४


### पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री
# सुखबीर सिंग बादल यांच्यावर नांदेडच्या गुरुद्वारात तलवारीने हल्ला
## मुख्यमंत्री फडणवीसांचे चौकशीचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३ नांदेड–** शिरोमणी अकाली दलाचे अध्यक्ष आणि पंजाबचे माजी सुखबीर सिंग बादल यांच्यावर नांदेडच्या गुरुद्वारात हल्ला करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. नांदेड साहिब गुरुद्वारात निहंग गटाने त्यांच्यावर शस्त्राने हल्ला केल्याचे सांगितले जात आहे. सुखबीर सिंग बादल आपली पत्नी आणि शिरोमणी अकाली दलाच्या खासदार हरसिमरत कौर बादल यांच्यासह गुरुद्वारात आले होते. या घटनेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही चौकशीचे दिले आहेत. गुरुद्वारात आल्या नंतर सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास एका निहंगाने तलवारीने त्यांच्या हातावर आणि खांद्यावर वार केला. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, यावेळी चार निहंग तिथे उपस्थित होते. बादल यांच्या सुरक्षा रक्षकांनी हस्तक्षेप करून हल्लेखोराला बाजूला केले. हल्लेखोर निहंगाला पोलिसांनी अटक केली असून पुढील चौकशी सुरू आहे.

सुखबीर सिंग बादल यांच्यावर हल्ला होण्याची ही पहिली वेळ नाही. यापूर्वी डिसेंबर



२०२४ मध्येही अमृतसरच्या सुवर्ण मंदिरात त्यांच्यावर गोळीबार करण्याचा प्रयत्न झाला होता. धार्मिक शिक्षा मिळाल्यानंतर सुखबीर सिंग बादल सुवर्ण मंदिरात सेवादार म्हणून सेवा देत होते. यावेळी एका व्यक्तीने त्यांच्यावर गोळीबार करण्याचा प्रयत्न केला होता. गुरुद्वाऱ्यातील हल्ल्यानंतर सुखबीर सिंग बादल यांना एका खासगी दाखल करण्यात आले. त्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे वृत्त समोर आले आहे. द इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या माहितीनुसार, बादल यांच्या हाताला जखम झाली असून रुग्णालयात जाताना त्यांनी तख्त साहिब गुरुद्वारात सत्कारानिमित्त मिळालेला सिरोपा (सन्मानवस्त्र) हातावर गुंडाळलेले दिसत आहे. सुखबीर सिंग बादल यांनी काल तख्त श्री पाटणा साहीब गुरुद्वारात दर्शन घेतले होते. ते तख्त श्री हुजूर साहिब गुरुद्वारात पोहोचले होते सुखबीर सिंग बादल यांच्या एक्स अकाऊंटवर सकाळी ११ वाजून १७ मिनिटांनी तख्त श्री हुजूर साहिब गुरुद्वारातील व्हिडीओ शेअर करण्यात आला होता. यावेळी त्यांच्याबरोबर त्यांची पत्नी आणि भटिंडाच्या खासदार हरसिमरत कौर बादल, दोन मुली आणि जावई आणि त्यांचा मुलगा उपस्थित होता.

# अपात्रता केली असती तर बहुमत आमचेच होते, सिब्बल यांचा युक्तिवाद
## पुढील सुनावणी आता १८ ऑगस्ट रोजी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३ मुंबई–** शिवसेना पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह एकनाथ शिंदे गटाला देण्याच्या केंद्रीय निवडणूक आयोगाच्या (एउख) निर्णयाविरोधात उद्धव ठाकरे गटाने दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सलग पाचव्या दिवशी जोरदार सुनावणी पार ठाकरे गटाचे वकील, ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी गुरुवारी आपला प्रदीर्घ युक्तिवाद पूर्ण केला. एकनाथ शिंदे यांच्यासह ३९ आमदार जर अपात्र ठरले, तर निवडणूक आयोगाने ज्या विधिमंडळ बहुमताच्या आधारे निर्णय दिला, तो पायाच उद्ध्वस्त होईल, असा घणाघाती दावा




सिब्बल यांनी केला. दरम्यान, ठाकरे गटाची बाजू मांडून पूर्ण झाली असून, अत्यंत महत्त्वपूर्ण प्रकरणाची पुढील सुनावणी आता १८ ऑगस्ट रोजी होणार आहे. १८ ऑगस्टपासून एकनाथ शिंदे गटाचे वकील सर्वोच्च न्यायालयात आपली बाजू मांडण्यास सुरुवात करतील.

निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, शिंदे गटाकडे ५३ तर ठाकरे गटाकडे ३४ लोकप्रतिनिधी आहेत. परंतु, अपात्रतेची कारवाई प्रलंबित असताना केवळ या आकड्यांवरून निर्णय देणे हा अत्यंत धोकादायक आहे. जर अपात्रतेच्या कारवाईत शिंदे गटाचे ३९ आमदार अपात्र ठरले, तर विधीमंडळातही ठाकरे गटाकडेच बहुमत उरेल. मग आयोगाचा हा निर्णय कसा वैध ठरू शकतो? असा सवाल सिब्बल यांनी केला.पक्ष संघटन महत्त्वाचे आहे असे म्हणत सादिक अली केसचा संदर्भ देण्यात आला आहे. प्रतिनिधी सभेनं पक्ष प्रमुखांची निवड केली. जर अपात्रता असती तर बहुमत आमचेच होते, असे सिब्बल म्हणाले.संसद कायदे करू शकते, परंतु त्या कायद्यांची कसोटी इथेच लावली जाते. सत्तेवर कोणताही पक्ष असला तरी, प्रत्येक सत्ताधारी पक्ष अपात्रतेच्या याचिकांवर निर्णय होऊ नयेत, असाच प्रयत्न करत असतो. देशात कायद्याचे राज्य टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असलेले कायदेशीर निकष निश्चित करण्याची संधी या आहे. केवळ न्यायालयच लोकशाहीचे रक्षण करू शकते, असे युक्तिवाद सिब्बल यांनी केला.

# होमगार्ड्सच्या हाती पोलीस वाहनांचं स्टेरिंग
## २,३०० होमगार्डना दिलं जाणार वाहनचालकाचं प्रशिक्षण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३मुंबई–** राज्य सरकारने होमगार्ड संदर्भात एक मोठा निर्णय घेतलाय. राज्यातील प्रशिक्षित होमगार्डना आता पोलिस वाहनांचे चालक म्हणून नियुक्त करण्यात येणार आहे. राज्यातील पोलिस घटकांकडून प्राप्त झालेल्या मागणीनुसार पहिल्या टप्प्यात एक हजार १५० वाहनचालक होमगार्ड तैनात करण्यास मान्यता देण्यात आलीय. त्यासाठी एकूण २३०० होमगार्ड्सला ४ आठवड्यांचे वाहनचालक प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

गृह विभागाने ३० जून २०२६ रोजी दिलेल्या मान्यतेनंतर पोलीस महासंचालक कार्यालयाने राज्यातील विविध पोलिस घटकांकडून आवश्यक वाहनचालक होमगार्डची माहिती मागवली होती. पोलीस घटकांनी १,९०५ वाहनचालक होमगार्डची आवश्यकता असल्याचे सांगितले.

मात्र प्राप्त मागणीच्या अनुषंगाने महासमादेशक होमगार्ड यांनी पहिल्या टप्प्यात १,१५० होमगार्ड तैनात करण्यास मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे पोलीस दलातील वाहनचालकांची कमतरता काही प्रमाणात दूर होण्यास मदत होणार आहे. तसेच प्रशिक्षित होमगार्डच्या कौशल्याचा




पोलिसांच्या दैनंदिन कामकाजासाठी उपयोग केला जाणार आहे.

पहिल्या १,१५० होमगार्डना सहा महिन्यांसाठी तैनात करण्यात येणार आहे. त्यानंतर सहा महिन्यांचा खंड देऊन दुसऱ्या टप्प्यात उर्वरित १,१५० प्रशिक्षित होमगार्डना पुढील सहा महिन्यांसाठी संधी दिली जाईल. अशाप्रकारे एका वर्षात दोन टप्प्यांत एकूण २,३०० प्रशिक्षित होमगार्डना वाहनचालक म्हणून काम करण्याची संधी मिळणार आहे.

पोलीस दलाच्या दैनंदिन कामकाजात रात्रीची गस्त, बंदोबस्त, तपास, ने-आण, घटनास्थळी तातडीने पोहोचणे, बिट मार्शल, व्हीआयपी बंदोबस्त, तसेच डायल ११२ यांसारख्या महत्त्वाच्या कामांसाठी वाहनचालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. दरम्यान सरकारच्या या नव्या निर्णयानुसार अहिल्यानगर जिल्ह्यात डायल ११२ वाहनांसह पोलीस वाहनांवर १०० प्रशिक्षित होमगार्डची नियुक्ती होणार आहे. या निर्णयानंतर जिल्हा पोलिस दलाला प्रशिक्षित मनुष्यबळ मिळण्याबरोबरच होमगार्ड जवानांनाही कौशल्याच्या जोरावर संधी उपलब्ध होतील.

सरकारने घेतलेल्या या निर्णयावर माजी समादेशक अधिकारी, नेवासे बाळासाहेब देवखिळे म्हणाले की, शासनाच्या या निर्णयामुळे होमगार्ड विभागात नवचैतन्य निर्माण झाले आहे. अपर पोलीस अधीक्षक तथा जिल्हा समादेशक वैभव कलबुर्गे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील १०० होमगार्ड जवान डायल ११२ वाहनचालक म्हणून आपली जबाबदारी उत्कृष्ट पद्धतीने पार पाडतील.

# मंत्री उदय सामंत यांच्या हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड, थोडक्यात बचावले




विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१३नागपूर–** शिवसेना शिंदेगटाचे नेते आणि उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाला. नागपूरवरून गडचिरोलीला जात असताना ही घटना घडली. उड्डाण करताच तांत्रिक झाल्याचे पायलटच्या लक्षात आल्याने मोठा अनर्थ टळला. उदय सामंत हे गडचिरोलीत पाहणी दौरा करण्यासाठी निघाले होते. या घटनेमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. मिळालेल्या माहितीनुसार, मंत्री उदय सामंत यांच्या हेलिकॉप्टर गुरूवारी सकाळी तांत्रिक बिघाड झाला. उदय सामंत नागपूरवरून गडचिरोली येथील सुरजागड येथे पहाणी दौरा करणार होते. हेलिकॉप्टर उड्डाणादरम्यान पायलटला तांत्रिक झाल्याचे लक्षात आला होता. त्यामुळे पायलटने उड्डाण थांबवलं यामुळे मोठा अनर्थ टळला. हेलिकॉप्टर उड्डाणापूर्वी तांत्रिक तपासणीत बिघाड लक्षात का आला नाही? याची चौकशी करण्याची मागणी स्थानिक शिवसैनिकांनी केली.

हेलिकॉप्टर स्टार्ट केल्यानंतर टेक ऑफ घेताना हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याानंतर उदय सामंत यांच्या गडचिरोली दौऱ्याला उशिर झाला. चं पायलटच्या लक्षात आलं. पायलटने वेळीच लक्ष दिल्याने आणि निर्णय घेतल्यामुळे आम्ही टेक ऑफच घेतला नाही.

# शेतकऱ्यांसाठी गुड न्यूज! आता ऑनलाईन खरेदी खत, केंद्र सरकारने दिलं मोठं गिफ्ट
## १५ऑगस्टपासून वाशिम जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर होणार सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३वाशीम–** राज्यातील शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकारने एक मोठं गिफ्ट दिले आहे. आता शेतकऱ्यांना खत खरेदीसाठी चिंता करण्याचे कारण नाही. कारण त्यांना ऑनलाईन खत खरेदी करता येणार आहे. केंद्र सरकारने खत करण्यासाठी पची निर्मिती केली आहे. १५ ऑगस्टपासून वाशिम जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर याची सुरुवात करण्यात येणार आहे. रासायनिक खत खरेदी करताना शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी केंद्र सरकारने एक प आणलं असून त्या पच्या माध्यमातून शेतकऱ्यांना थेट ऑनलाईन खत खरेदी करता येणार आहे. याचा शुभारंभ १५ ऑगस्ट पासून प्रायोगिक तत्त्वावर वाशिम होणार आहे. आता ऑनलाईन खत




खरेदी करता येणार असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. केंद्र सरकारनं 'फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल' हे प तयार केलं आहे. १५ ऑगस्ट पासून प्रायोगिक तत्वावर वाशिम जिल्ह्यातून या पची सुरुवात होणार आहे. या पद्वारे शेतकऱ्यांना रासायनिक खताची ऑनलाइन बुकिंग करता येणार असून जिल्ह्यातील खतसाठाही मोबाईलवरच येणार आहे. त्यामुळे खत वितरण अधिक सुलभ, पारदर्शक होऊन शेतकऱ्यांना योग्य वेळी खत मिळण्यास मदत होणार आहे. केंद्र सरकारने सुरू केलेल्या 'फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल' या पची माहिती गावपातळीपर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्ह्यात सध्या खत विक्रेत्यांना प्रशिक्षण दिलं जात आहे. वाशिमनंतर राज्यातील इतर सर्व ठिकाणी हे प सुरू केले जाईल आणि वापर करुन शेतकऱ्यांना खत खरेदी करता येईल. यामुळे त्यांचे टेन्शन कमी होईल.

# 'माझ्याबद्दल बोलून माझ्या शरीरावर, चेहऱ्यावर..' चंद्रशेखर बावनकुळे भावूक
### जरांगे पाटलां कडून सातत्याने होतेय टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३नागपूर–** मागच्या काही दिवसांपासून मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील सातत्याने चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर टीका करत आहेत. जरांगे पाटील यांच्याकडून चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मनाला लागेल अशी टीका सुरु आहे. जरांगे पाटील यांच्याकडून सातत्याने असलेल्या टीकेवर आज चंद्रशेखर बावनकुळे बोलले आहेत. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आज पत्रकार परिषदेत भावूक झाले. मलाही कुटुंब असल्याचं त्याने सांगितलं. सध्या



मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांनी टीकेचा सपाटा लावला आहे. माझ्याबद्दल व्यंग करुन, माझ्याबद्दल वाईट बोलून शरीरावर, चेहऱ्यावर टीका करुन त्यांना आनंद आहे. यातून त्यांच्या समाजाला न्याय मिळणार असेल तर नक्कीच त्यांनी माझी टिंगलटवाळी करावी असं चंद्रशेखर बावनकुळे बोलले.

मी कधी वाईट वागलो नाही. जातीभेद केला नाही. मराठा ओबीसी वादात पडलो नाही. माझ्याबद्दल गैरसमज झाला असेल, महसूल खात्याने इतकं काम काम केल्यानंतर व्यंग होत असेल तर त्याला अर्थ नाही असं चंद्रशेखर यांनी सांगितलं. माझही कुटुंब आहे. माझी पत्नी कुणबी आहे, सूनबाई मराठा आहे असं बावनकुळे यांनी सांगितल

# भोंदू अशोक खरातची फरार पत्नी अखेर समोर आली, कल्पना खरातची शिर्डी पोलीस ठाण्यात हजेरी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३शिर्डी–** नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याच्या प्रकरणात मोठी घडामोड समोर आली आहे. अशोक खरातची पत्नी कल्पना खरात आज गुरुवारी (१३ ऑगस्ट) शिर्डी पोलीस ठाण्यात हजर झाली. शिर्डीतील जमीन आणि बेकायदेशीर सावकारी प्रकरणात आरोपी असलेल्या कल्पना खरात यांच्याविरोधात पोलिसांनी यापूर्वी लूकआऊट नोटीस जारी केली होती. त्यामुळे अनेक महिन्यांपासून तपास यंत्रणांच्या रडारवर असलेल्या कल्पना खरात अखेर पोलिसांसमोर आली आहे. सुप्रीम कोर्टाकडून अंतरिम जामीन मिळाल्यानंतर कल्पना शिर्डी पोलीस ठाण्यात हजर झाली. महत्त्वाची बाब म्हणजे, कोणालाही कुणकुण लागू न देता कल्पना शिर्डी पोलीस स्टेशनच्या मागच्या दाराने पोलीस स्टेशनमध्ये आली असे सांगण्यात आले आहे.



शिर्डी परिसरातील शेतकरी रावसाहेब गोंदकर यांच्या तक्रारीवरून अशोक खरात, त्याची पत्नी कल्पना खरात आणि अन्य आरोपींविरोधात शिर्डी पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. जमीन फसवणूक आणि बेकायदेशीर सावकारी या आरोपांशी संबंधित हे प्रकरण आहे. गोंदकर यांच्या आरोपानुसार, कर्ज व्याजाच्या व्यवहारातून त्यांची शिर्डी परिसरातील सुमारे साडेचार एकर जमीन हडपण्यात आली. या जमिनीची बाजारातील किंमत सुमारे ५० कोटी रुपये असल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला असून, ती अवघ्या साडेपाच कोटी रुपयांच्या व्यवहारात घेण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रकरणात अशोक खरात, कल्पना खरात, अरविंद बावके, किरण सोनवणे आणि अशोक तांबे अशा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

शिर्डी पोलिसांत गुन्हा दाखल झाल्यानंतर एप्रिल २००६च्या सुरुवातीला कल्पना खरात फरार झाल्याचे समोर आले होते. त्यांचा मोबाईल नॉट रिचेबल असल्याने पोलिसांसमोर त्यांचा शोध घेण्याचे आव्हान निर्माण झाले होते.

# अमरावतीत 'हर घर' अंतर्गत भव्य तिरंगा रॅली

## हजारो नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती–**
देशभक्तीची भावना जनमानसात जागृत करण्यासह राष्ट्रध्वज तिरंग्याबद्दल आदर, अभिमान आणि आत्मीयता निर्माण करण्याच्या उद्देशाने अमरावती महानगरपालिकेच्या वतीने 'हर घर तिरंगा' उपक्रमांतर्गत भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले.नेहरू मैदान येथून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅलीला सुरुवात झाली.

रॅलीने राजकमल जयस्तंभचौक, मालवीय चौक आणि इर्विन चौक मार्गे शहरातून मार्गक्रमण करत संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे समारोप केला. रॅलीदरम्यान जयस्तंभचौक येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच इर्विन चौक येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. रॅलीमध्ये हजारो महापालिकेचे अधिकारी-कर्मचारी, लोकप्रतिनिधी, व्यापारी, विविध शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था तसेच सामाजिक संघटनांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.



तिरंगा हातात घेऊन देशभक्तीच्या घोषणांनी भारावलेल्या वातावरणात निघालेल्या या रॅलीने शहरात राष्ट्रप्रेमाचा उत्साह निर्माण केला. यावेळी उपस्थितांनी तिरंगा प्रतिज्ञा तसेच अवयवदानाची शपथ घेतली. विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर नृत्य सादर करून उपस्थितांची दाददाद मिळवली. रॅलीच्या रंगीबेरंगी तिरंगा फुगे आकाशात सोडण्यात आले. 'हर घर तिरंगा' उपक्रमांतर्गत १२ ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, तिरंगा रॅली हा त्यातील महत्त्वाचा उपक्रम ठरला.रॅलीला महापौर श्रीचंद तेजवानी, आयुक्त डॉ.मंगेश गोंदावले, उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेते चेतन गावंडे, गटनेते आमले, गटनेते डॉ.राजेंद्र तायडे, गटनेते शेख हमीद शेख वाहेद, झोन सभापती माधुरी ठाकरे, स्वाती कुलकर्णी, इस्माइल कासम लालुवाले, किशोर जाधव, खॉ आसिया अंजुम वहिद, विधी समिती सभापती स्नेहा लुल्ला व उपसभापती डॉ.मधुरा कहाळे, शहर सुधार समिती सभापती राधा कुरील व उपसभापती सुमती ढोके, माध्यमिक पुर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा सभापती ॲड.प्रिती हर्षल रेवणे व उपसभापती वंदना मडघे, महिला व बाल कल्याण समिती सभापती ममता आवारे व उपसभापती लता देशमुख, नगरसेवक, नगरसेविका, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे, महापालिका व पोलिस विभागाचे अधिकारी-कर्मचारी, विद्यार्थी, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# मेळघाटच्या सीमेवर पिस्तुल, काडतूस जप्त

## खकनार पोलिसांची धडक कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३मेळघाट**
मेळघाटपासून केवळ ९ किलोमीटर अंतरावरील मध्य प्रदेशातील खकनार गावाजवळ शक्तीसिंग बादलसिंग सिकलीगर याच्याकडून पाचोरी निर्मित १३ बंदूक आणि ४५ जिवंत गोळ्या जप्त करण्यात आल्या आहेत. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे.

मध्य प्रदेश आणि महाराष्ट्राच्या सीमेवर असलेल्या पाचोरी गावात जपान बनावटीच्या आणि ब्रांडेड कंपनीच्या हुबेहूब पिस्तुली, मॅगझिन तथा काडतूस तयार करणे सुरू आहे. गेल्या एका वर्षात १२ प्रकरणात ४७ पिस्तुल आणि असंख्य जिवंत काडतुसे पकडली गेली असा खुलासा बुरहानपूर पोलिस अधीक्षक आशुतोष बागरी यांनी केला. खकनार जवळच्या जंगलात एक अज्ञात व्यक्ती पिस्तुली घेऊन लपलेला असल्याची माहिती ठाणेदार अभिषेक यांना प्राप्त होताच पोलिस पथकाने मोक्यावर धाव घेतली. शक्तीसिंग यास अटक केली. त्याच्याकडून १३ पिस्तुल, १ मॅगझिन आणि सोबत ४५ काडतुसे जप्त करण्यात आली. खकनार पोलिस ठाणेअंतर्गत असलेले पाचोरी गाव अगदी राज्याच्या सीमेवर आहे.

पोलिस कारवाईची भनक लागताच शस्त्र तस्करी करणारे मेळघाटच्या जंगलात शरण घेत पोलिसांना हुलकावणी देत पोलिस अधीक्षक आशुतोष बागरी यांच्या मार्गदर्शनात प्रदीप शेंडे, सुरेश महाले, अभिषेक जाधव या अधिकाऱ्यांनी व त्यांच्या कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली. जप्त शस्त्रांची किमत ४.७२ लाख आहे. मुख्य आरोपी शक्तीसिंग मध्यप्रदेशातील ओझर नागलवाडी गावाचा रहिवाशी आहे. मध्य प्रदेशातील ठाण्यांमध्ये शक्तीचा रेकॉर्ड तपासला जात आहे. मागील २० वर्षांत पाचोरी गावात अनेक पोलिस कारवाई झालेली असूनही अवैध हत्यारे बनविण्याचे घरगुती कारखाने बंद पडलेले नाहीत.

# अमरावती विद्यापीठाची पीएच.डी. प्रवेश प्रक्रिया सुरू

## ऑनलाईन अर्ज करता येणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती–** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातर्फे आचार्य पदवी प्रवेश परीक्षा २०२६ आयोजित करण्यात येणार आहे. पीएच.डी. प्रवेशासाठी इच्छुक पात्र विद्यार्थ्यांनी विद्यापीठाने दिलेल्या वेळापत्रकानुसार ऑनलाईन सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. ऑनलाईन अर्ज १३ ऑगस्टपासून करता येणार. इच्छुक उमेदवारांनी विद्यापीठाच्या ुीसलरीं.रल.ळप या संकेतस्थळावरील न्यूज एंड अनाऊन्समेंटमध्ये तसेच पीएच.डी. सेल या पोर्टलमध्ये उपलब्ध माहितीनुसार अर्ज करावा.




पेट-२०२६ साठी ऑनलाईन अर्ज हीींिं://ीसलरीं.षेीिींलाळीं.ळप या संकेतस्थळावरून भरता येणार आहे. विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावरही (हीींिं://ुीसलरीं.रल.ळप) प्रवेश परीक्षेसंदर्भातील आवश्यक माहिती करून देण्यात आली आहे.

पेट परीक्षेची तारीख परीक्षेच्या सुमारे एक महिना अगोदर जाहीर करण्यात येणार आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र परीक्षेच्या सात दिवस अगोदर उमेदवारांच्या लॉगिनमध्ये उपलब्ध करून देण्यात येईल. विद्यापीठाशी संलग्न असलेल्या संबंधित परीक्षा केंद्रांवर ऑनलाईन पद्धतीने ही परीक्षा आयोजित करण्यात येणार आहे.

पीएच.डी. प्रवेश परीक्षेसाठी अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांनी परीक्षा, अभ्यासक्रम, नियम व इतर आवश्यक सूचनांची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून काळजीपूर्वक वाचावी. अर्ज भरताना कोणतीही चूक होणार नाही याची उमेदवारांनी विशेष दक्षता घ्यावी. पीएच.डी. संशोधनासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी अंतिम मुदतीची प्रतीक्षा न करता आवश्यक कागदपत्रे व माहिती तयार ठेवून वेळेत ऑनलाईन अर्ज सादर करावा, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने करण्यात आले

# जिल्हा बँकेची हायकोर्टात धाव...

## १,१३२ अर्जदारांना मानीव सभासदत्व देण्याचे प्रकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती :** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभासदत्वासंदर्भात सहकारमंत्र्यांच्या दिलेल्या निर्णयाविरोधात जिल्हा बँकेने उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. १,१३२ अर्जदारांना त्यांनी अर्ज केलेल्या तारखेपासून मानीव सभासदत्व देण्याचे निर्देश सहकारमंत्र्यांनी दिल्यानंतर बँकेने या निर्णयाला आव्हान देणारी याचिका दाखल केली आहे. याचिकेवर सोमवारी, १७ ऑगस्ट रोजी सुनावणी होणार असल्याने या सुनावणीकडे जिल्ह्यातील हजारो अर्जदारांचे लक्ष लागले आहे.सन २०२३ मध्ये जिल्हा बँकेने १,००५ वैयक्तिक अर्जदारांना सभासदत्व दिले होते. त्याच कालावधीत सप्टेंबर २०२३ ते ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत जिल्हाभरातून सुमारे सहा हजारांहून अधिक व्यक्तींनी बँकेच्या सभासदत्वासाठी अर्ज केले होते. मात्र,




त्यानंतर बँकेच्या उपविधीतबदल अनेक अर्जदारांचे सभासदत्वना कारण्यात आले. या निर्णयाविरोधात १,१३२ अर्जदारांनी सहकार विभागाकडे अपील दाखल केले होते. तब्बल तीन वर्षे या प्रकरणाची कायदेशीर लढाई सुरू होती. अर्जदारांनी दाखल केलेल्या पुनरिक्षण अर्जावर निर्णय देताना सहकारमंत्र्यांनी विभागीय सहनिबंधकांचा आदेश दोषपूर्ण असल्याचे नमूद करून तो रद्द केला. तसेच १,१३२ अर्जदारांना त्यांनी बँकेचे मानीव सभासदत्व देण्याचे दिले. दरम्यान, सहकारमंत्र्यांच्या निर्णयाला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. या प्रकरणाची सुनावणी १७ऑगस्ट रोजी होणार आहे.

# विद्यार्थ्यांच्या हातून वृक्षारोपण

## वडाळीत पर्यावरण संवर्धनाचा जागर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती** वडाळी : वाढते तापमान, बदलते हवामान आणि ढासळता पर्यावरणीय समतोल यामुळे वृक्षारोपणा सोबतच वृक्षसंवर्धनाची गरज दिवसेंदिवस वाढत आहे. याच पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची निर्माण करण्यासाठी महानगरपालिका उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळा क्रमांक १४, वडाळीच्या विद्यार्थ्यांनी पुढाकार घेत वृक्षारोपणाचा स्तुत्य उपक्रम राबविला.शाळेच्या परिसरात सध्या बांधकाम सुरू असल्याने तेथे वृक्षारोपण करणे शक्य नव्हते. मात्र, विद्यार्थ्यांनी वृक्ष लावण्याची इच्छा व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या या सकारात्मक भावनेला प्रतिसाद देत कैलास धाम संवर्धन समिती आणि मनपा उच्च प्राथमिक माध्यमिक शाळा क्र. १४ यांच्या संयुक्त विद्यमाने एसआरपीएफ कॅम्प, वडाळी कॉलनी परिसर तसेच कैलास धाम येथे विद्यार्थ्यांच्या हस्ते विविध वृक्षांची लागवड करण्यात आली.या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत रोपे लावली. केवळ वृक्षारोपण करून न थांबता लावलेल्या रोपांचे संगोपन व संवर्धन करण्याची जबाबदारी स्वीकारण्याचा संकल्पही विद्यार्थ्यांनी केला. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाप्रती आस्था, सामाजिक बांधिलकी आणि जबाबदारीची भावना अधोरेखित झाली.आज लावलेले एक रोप म्हणजे उद्याच्या पिढीसाठी सावली, शुद्ध हवा आणि सुरक्षित पर्यावरणाची हमी, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक योगेश पखाले, शिक्षक मोनिका पंधरे, कु. वैशाली देशमुख यांच्यासह विद्यार्थी तसेच कैलास धाम संवर्धन समितीचे विजय बाभुळकर, अनिलजी कोपरे, विजयजी सुनीलजी मोहनकर, विनोदजी राऊत, श्रीरामजी फाले, मुंजाळे आप्पाजी, पवनजी चिंचोळकर, दीपकजी लोखंडे, प्रफुल्लजी बोके आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

# धामणगावात घरोघरी तिरंगा अभियानातर्गत तिरंगा रॅली

## भाजपाचे आयोजन, आ. प्रतापदादा अडसड यांची उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३धामणगाव रेल्वे–**
'हर घर तिरंगा' अभियानाअंतर्गत आ प्रतापदादा अडसड यांच्या नेतृत्वाखाली आज तिरंगा यात्रेचं आयोजन करण्यात आलं होतं.

भाजपा , भाजयुमो, भाजपा आघाडी च्या वतीने 'हर घर तिरंगा' अभियानाअंतर्गत आज शहरात बाईक रॅलीचं आयोजन केलं होतं. ही रॅली दत्तापूर येथून निघाल्यानंतर कॉटर मार्केट चौक अमर शहीद भगतसिंग चौक गांधी चौक मेन लाईन शास्त्री चौक शिवाजी चौक येथे आली. स्वतः बाईक चालवित आमदार प्रतापदादा अडसड यांनी या रॅलीचे नेतृत्व केले.



रॅलीत धामणगाव विधानसभा रावसाहेब रोठे, नगराध्यक्ष डॉ अर्चनाताई अडसड रोठे, उपाध्यक्ष गिरीष मुंदडा, नगरसेवक, भाजपाचे पदाधिकारी व सामाजिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दुचाकीसह या रॅलीत सहभाग घेतला होता .

डॉ. मुकुंदराव पवार सैनिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी गणवेशा परिधान करीत हातात राष्ट्रध्वज घेऊन या रॅलीत सहभागी झाले होते. यावेळी विविध राष्ट्रपुरुषांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून त्यांना प्रतापदादा अडसड यानी अभिवादन केले. मेरा रंग दे बसंती चोला हे गीत अमर शहीद भगतसिंग चौकात आ. प्रतापदादा अडसड यांनी सादर केले. यावेळीदेश की रक्षा कोण करेंगे - हम करेंगे हम करेंगे, भारत माता की जय' आणि 'वंदे मातरम'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.'हर घर तिरंगा'सोबतच राष्ट्रीय एकात्मता जोपासतप्रत्येक हातात तिरंगा घेतल्यावर देशाप्रती आपले कर्तव्य लक्षात ठेवावे, असे आवाहन आ प्रतापदादा अडसड यांनी केले

# स्वातंत्र्यदिनी 'महा रक्तदान शिबिराचे' आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**
महा रक्तदान शिबिराचे आयोजन शनिवार, दि. १५ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता हॉटेल ग्रँड महफिल येथील रुबी हॉल येथे करण्यात आले आहे.



राज्य उत्पादन आणि अमरावती जिल्हा मद्य विक्रेता संघटना यांच्या वतीने हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

'रक्तदान - शहिदों के नाम' अशी संकल्पना या शिबिराची ठेवण्यात आली आहे. या शिबिराचे आयोजन राज्य उत्पादन शुल्कचे विभागीय उपायुक्त डॉ. पराग नवलकर, राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक शशिकांत गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. तसेच, महा शिबीर आयोजन समितीचे अध्यक्ष नितीन देशमुख, उपाध्यक्ष अनिल भामोरे, दीपक गुडधे, विजय जयस्वाल, सुरेश चांदवानी, बाबूसेठ मतानी आणि इतर सर्व पदाधिकारी व सदस्यांच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.

स्वातंत्र्य दिनी रक्तदान करून आरोग्य यज्ञात सहभागी व्हावे, तसेच राष्ट्रसेवा आणि मानवसेवेचे कार्य करावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# जिल्हास्तरीय रेड रन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद: विजेत्यांची राज्यस्तर स्पर्धेसाठी निवड

## एचआयव्ही,एड्स प्रतिबंधाबाबत युवकांत जनजागृती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ अमरावती**
एचआयव्ही,एड्स प्रतिबंधाबाबत युवकांमध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने आंतरराष्ट्रीय युवा पंधरवाड्यानिमित्त आयोजित जिल्हास्तरीय रेड रन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण जिल्हा सामान्य रुग्णालय, आरडीआयके महाविद्यालय बडनेरा, राष्ट्रीय सेवा योजना, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांच्या संयुक्त सहकार्याने आयोजित या स्पर्धेत युवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला असून, विजेतांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार, आरडीआयके महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देशमुख, प्रा. अतुल पाटील, जिल्हा कार्यक्रम अधिकारी अजय साखरे, नकुल देशमुख, प्रा. प्रिती देशमुख आणि जिल्हा पर्यवेक्षक प्रकाश शेगोकार यांच्या उपस्थितीत हिरवी झेंडी दाखवून स्पर्धेचा प्रारंभ करण्यात आला. या वेळी मार्गदर्शन करताना डॉ. पवार यांनी एचआयव्ही संक्रमणाची तीव्रता कमी करण्यासाठी युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. जनजागृतीच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी युवकांनी पुढाकार घेण्याचे आवाहन त्यांनी तसेच राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. स्पर्धेत जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील रेड रिबन क्लब सदस्यांसह विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे नियम, मार्ग आणि आयोजनाबाबत प्रा.अतुल पाटील यांनी मार्गदर्शन केले.पुरुष गटात श्यामा प्रसाद



मुखर्जी महाविद्यालय, शेंदुरजना घाटचा पीयुष मसाने प्रथम, प्रज्वल हटले द्वितीय, तक्षशिला महाविद्यालयाचा शंकर नांदे तृतीय आला. महिला आरडीआयके महाविद्यालयाची वैष्णवी वानखडे प्रथम, नाथे विद्यालयाची मीनाक्षी खारपाटे द्वितीय आणि महिला महाविद्यालयाची निशा जगताप तृतीय ठरली. कार्यक्रमाचे संचालन अजय खेडकर यांनी केले. तर स्पर्धेसाठी एच आई व्ही साठी कार्यरत संस्था समर्पण ट्रस्ट, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शिक्षण व आरोग्य मंडळ मोझरी, श्री शिवाजी शिक्षण संस्था, भाग्योदय शिक्षण व संस्था, सत्यदेव बाबा महिला मंडळ मोझरी, लोकेश पवार, दामोदर गायकवाड, नरेश मंथापुरवार, चंद्रकांत हिरोडे, विशाल भोंबे, किशोर पाथरे, प्रवीण म्हसाळ यांनी सहकार्य केले.

# वाहतूक विस्कळीत, पण वाहतूक पोलीस नेमके गेले कुठे?





अमरावती शहरात सध्या वाहतुकीचा प्रश्न गंभीर रूप धारण करत आहे. राजकमल चौक, जयस्तंभ चौक, इरविन चौक, राजापेठ आणि बस स्थानक परिसर असो वा गांधी चौक; शहराच्या प्रत्येक प्रमुख मार्गावर आणि चौकात दररोज वाहतूक कोंडीचे चित्र पाहायला मिळत आहे. सामान्य नागरिक, मुले आणि नोकरदार वर्ग या कोंडीमुळे त्रस्त झाले आहेत.अमरावतीची वाहतूक व्यवस्था इतकी विस्कळीत झाली आहे, मग शहराचे वाहतूक पोलीस नेमके गेले कुठे असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडला आहे.

# तुकाराम मुंढे साहेब, एकदा इकडं या,

## तेलापासून भाजीपाल्यापर्यंत बुलढाण्याच्या ७५ वर्षीय आजींचा व्हिडीओ तुफान व्हायरल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३बुलढाणा-** अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त म्हणून पदभार स्वीकारल्यापासून आपल्या धडाकेबाज कारवायांनी राज्यभरातील भेसळमाफियांना सळो की पळो करून सोडणारे आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे सध्या पुन्हा एकदा प्रचंड आले आहेत. अशातच बुलढाण्यातील एका ७५ वर्षीय आजींचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत असून, त्यांनी मुंढे यांना थेट बुलढाण्यात येऊन धडक कारवाई करण्याची कळकळीची विनंती केली आहे.




मुंढे साहेब, एकदा बुलढाण्यात आणि खामगावात या इकडचे साहेब लोक पैसे खातात आणि काहीच कारवाई करत नाहीत, असा गंभीर आरोप करत आजींनी स्थानिक प्रशासनाच्या कारभाराचे वाभाडे काढले आहेत.व्हायरल झालेल्या या व्हिडीओमध्ये आजींनी आपल्या भागातील अन्नभेसळ आणि भ्रष्टाचारावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. मुंढे साहेब, आमच्या बुलढाणा जिल्ह्यात आणि खामगावात सगळ्याच गोष्टींमध्ये नुसती भेसळ सुरू आहे. दुकानातील तेलात, केळी आणि पपई पिकवण्यासाठी रासायनिक औषधे वापरली जात आहेत. भाजीपाल्यामध्येही भेसळ आहे. साहेब लोक फक्त पैसे खातात आणि गप्प बसतात, कोणीच काम करत नाही, असा आरोप आजींनी केला आहे.

एवढेच नव्हे तर स्थानिक सरकारी दवाखान्यातही मोठा घोटाळा सुरू असून याकडे कोणीही लक्ष देत नसल्याची व्यथा त्यांनी मांडली. त्यामुळे मुंढे साहेबांनी स्वतः येथे येऊन या साखळीचा पर्दाफाश करावा, अशी विनंती त्यांनी केली

### राज्यभरात 'मुंढे पॅटर्न'चा दणका

तुकाराम मुंढे यांनी एफडीएचे आयुक्तपद हाती घेतल्यापासून हॉटेल्समधील अस्वच्छता, भेसळयुक्त पनीर, बनावट दूध तसेच प्रतिबंधित गुटखा आणि पानमसालाविरोधात राज्यव्यापी धडक मोहीम उघडली आहे. त्यांच्या या कडक आणि पारदर्शक कार्यपद्धतीमुळे सामान्य जनतेमध्ये मोठा विश्वास निर्माण झाला आहे त्यामुळेच स्थानिक यंत्रणेकडून न्याय आणि कारवाई होत नसल्याने वैतागलेल्या या आजींनी थेट तुकाराम मुंढे यांच्याकडेच 'साकडे' घातले आहे. सध्या हा व्हिडीओ विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर जोरदार व्हायरल होत असून, नेटकऱ्यांकडूनही यावर मोठ्या प्रमाणात प्रतिक्रिया येत आहेत.

## सदिच्छा भेट !



नवी दिल्ली येथे आज लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांची आमदार रवी राणा व भाजपा नेत्या माजी खासदार नवनीत राणा घेतली सदिच्छा भेट घेतली .

# भरधाव आयसर ट्रकची बैलगाडीला धडक; तीन शेतमजूर जखमी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१३तिवसा**

अमरावती-नागपूर राष्ट्रीय महामार्गावर तिवसा सॉफ्ट कॉर्नरजवळ भरधाव आयसर ट्रकने बैलगाडीला जोरदार दिल्याने बैलगाडीवरील तीन शेतमजूर जखमी झाले. यातील एकाची प्रकृती गंभीर असून बैलगाडीला जुंपलेले दोन्ही बैलही जखमी झाले आहेत. त्यापैकी एका बैलाची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे.



हा अपघात गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी सुमारे १.४० वाजताच्या सुमारास घडला. शेतातून शेतमजुरांना घेऊन बैलगाडी तिवसाकडे येत असताना नागपूरच्या दिशेने वेगाने जाणाऱ्या मालवाहू आयसर ट्रकने बैलगाडीला जोरदार धडक दिली. धडकेमुळे बैलगाडीचे नुकसान झाले.अपघाताची माहिती मिळताच तिवसा पोलिसांनी घटनास्थळी तातडीने धाव घेतली. पोलिसांनी अपघातास कारणीभूत ठरलेला एमएच १६ डीपी ०३०१ क्रमांकाचा टाटा आयसर ट्रक ताब्यात घेतला आहे.जखमींना तातडीने तिवसा शासकीय सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील त्यांना अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आले.या अपघातात किसन हिरवाळे (वय ५०, रा. तिवसा) हे गंभीर जखमी झाले आहेत. तर संकेत भोंबे (वय २५, रा. तिवसा) आणि अंकुश ठाकरे (वय ३२, रा. तिवसा) हे जखमी झाले आहेत.दरम्यान, अपघातात बैलगाडीला जुंपलेले दोन्ही बैलही जखमी झाले असून एका बैलाची प्रकृती गंभीर सांगण्यात येत आहे. या प्रकरणी तिवसा पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.-

# मोर्शीत मोकाट जनावरांचा धुमाकूळ

## कॉलनी परिसरात दहशत, वाहन चालकांच्या अपघाताचा धोका वाढला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३मोर्शी**

शहरातील विविध कॉलनी परिसरातील रस्त्यांवर मोकाट जनावरांचा वावर दिवसेंदिवस वाढत असून, नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे या मोकाट जनावरांना पकडून कोंडवाड्यात यावे, तसेच त्यांच्या मालकांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. शहरातील हनुमाननगर, प्रकाश कॉलनी, राधाकृष्ण कॉलनी तसेच नंद स्मित कॉलनी परिसरातील सिमेंट रस्त्यावर मोठ्या संख्येने जनावरे ठाण मांडून बसत असल्याने वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. विशेषतः



रात्रीच्या वेळी रस्त्यावर बसलेली जनावरे अचानक वाहनांसमोर आल्याने अपघात होण्याची शक्यता येत नाही. कॉलनी परिसरातील प्रमुख रस्त्यांवर सकाळपासून रात्रीपर्यंत मोकाट जनावरांचे कळप दिसून येतात.

रस्त्याच्या मधोमध किंवा वळणाच्या ठिकाणी जनावरे बसलेली असल्याने दुचाकी तसेच चारचाकी वाहनचालकांना वाहने नियंत्रित करणे कठीण होत आहे. एखाद्या वाहनाची जनावरासोबत धडक झाल्यास चालकाचे नियंत्रण सुटून गंभीर अपघात होण्याची शक्यता आहे. धडकेनंतर जनावर थेट वाहनावर आदळल्यास प्रवाशांनाही गंभीर दुखापत होऊ शकते. रस्त्यांवर मोकाट जनावरांमुळे अपघात घडल्याच्या घटना यापूर्वीही घडल्या आहेत. त्यामुळे मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी नगरपरिषदेने या समस्येकडे लक्ष देण्याची गरज आहे. केवळ जनावरांना पकडण्याची कारवाई करून थांबण्याऐवजी त्यांची योग्य व्यवस्था करणे, संबंधित पशुमालकांवर जबाबदारी निश्चित करणे आणि पुन्हा जनावरे रस्त्यावर येणार नाहीत, यासाठी ठोस उपाययोजना आवश्यक आहे.

**मोठ्या दुर्घटनेची वाट पाहू नका** – मोकाट जनावरांचा प्रश्न हा केवळ वाहतुकीच्या अडथळ्यापुरता मर्यादित नसून नागरिकांच्या जीविताशी संबंधित गंभीर प्रश्न आहे. एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा त्यापूर्वीच प्रशासनाने प्रभावी कारवाई करणे गरजेचे आहे. नगरपरिषद प्रशासनाने शहरातील कॉलनी परिसर तसेच अमरावती-वरुड मार्गाची पाहणी करून रस्त्यावर फिरणाऱ्या व बसणाऱ्या मोकाट तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### अमरावती-वरुड मार्गावरही धोका

दरम्यान, अमरावती-वरुड मार्गावरही मोकाट जनावरे रस्त्यावर बसत असल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या मार्गावर वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असते. अशा परिस्थितीत रस्त्यावर अचानक जनावरे आल्यास दुचाकीस्वार तसेच चारचाकी वाहनचालकांना वाहनाचा वेग नियंत्रित करणे कठीण होऊ शकते. त्यामुळे या मार्गावरही अपघाताचा धोका आहे.

# पहिला गणवेश उधारीवर, दुसरा लांबणीवर!राज्यात २८ लाख ७७ हजार तर जिल्ह्यात १लाख १ हजार३३१ विद्यार्थी वंचित

## जोड-मोज्यांची योजनाही गुंडाळल्याची चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३ अमरावती-** : समग्र शिक्षा अभियानांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इयत्ता १ ली ते ८ वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना दरवर्षी दोन मोफत गणवेश देण्यात मात्र, चालू शैक्षणिक वर्षात आतापर्यंत विद्यार्थ्यांना केवळ एकच गणवेश मिळाला आहे. दुसऱ्या गणवेशाची विद्यार्थी प्रतीक्षा करीत आहेत. गणवेशासाठीचा निधीदेखील शाळा व्यवस्थापन समित्यांना अद्याप प्राप्त झालेला नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचा एक गणवेश उधारीवर तर दुसरा गणवेश लांबणीवर अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.स्वातंत्र्य दिन येत आहे पण दुसरा गणवेश नाही.

राज्यात शासकीय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पहिली ते आठवीच्या सुमारे २८ लाख ७७ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना, तर जिल्ह्यात १लाख१ हजार३३१ विद्यार्थ्यांना दुसऱ्या गणवेशापासून वंचित राहावे लागले आहे. गणवेश खरेदी करून दीड महिना लोटला आहे. त्यामुळे गणवेशाच्या पैशांसाठी पुरवठादाराकडून मुख्याध्यापकांकडे सातत्याने विचारणा होत आहे. बाजारात मुख्याध्यापकांची पत पणाला लागली आहे.



### जोड-मोज्यांची योजनाही गुंडाळल्याची चर्चा

या योजनेसह राज्य शासनाकडून विद्यार्थ्यांना मोफत जोडे-मोजे देण्याची योजना दोन वर्षांपूर्वी सुरू करण्यात आली होती. प्रति विद्यार्थी १७० रुपये प्रमाणे निधी शाळा व्यवस्थापन समितीला उपलब्ध करून दिला जात होता. परंतु, यावर्षी अद्याप निधी उपलब्ध करून दिलेला नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या लाभाची ही योजनादेखील शासनाने गुंडाळल्याची चर्चा लाभाच्या योजनांची योग्य पद्धतीने व विहित कालमर्यादेत अंमलबजावणी होत नाही, ही बाब दुर्दैवी आहे. अशा विलंबामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर व शाळेच्या पटसंख्येवर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे पहिल्या गणवेशाचा थकीत निधी तातडीने शाळा व्यवस्थापन समित्यांच्या खात्यात जमा करावा. तसेच दुसरा गणवेश किंवा त्यासाठीचा निधी कोणताही विलंब न करता उपलब्ध करून द्यावा, मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी केली आहे.गणवेश योजनेसाठी ६० टक्के निधी केंद्र शासनाकडून उपलब्ध करून दिला जातो, तर उर्वरित ४० टक्के निधी राज्य शासनाला द्यावा लागतो. निधी वेळेत उपलब्ध न झाल्याने विद्यार्थ्यांना गणवेशासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे.

# ३ लाख ३० हजार वगळलेल्या मतदारांची यादी प्रसिद्ध

## यादीतील सुधारणेसाठी बीएलओशी संपर्क साधावा - जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१३अमरावती**

विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमात जिल्ह्यातील लाख ३० हजार ४०१ मतदार वगळण्यात आले आहेत. वगळण्यात आलेल्या मतदारांच्या नावाची यादी रीरींरींळ.र्सी.ळप संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. वगळलेल्या मतदारांच्या यादीत नाव असल्यास तातडीने बीएलओंशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे. जिल्ह्यात १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकावर आधारित मतदारयाद्यांचा विशेष पुनरीक्षण कार्यक्रम जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या अंतर्गत गणना अर्जांचे वितरण व डिजिटायझेशनचे काम सुरु आहे. भारत निवडणूक आयोगाच्या अधिकृत प्रणालीवर ११ ऑगस्ट २०२६ रोजी ही माहिती प्रसिद्ध झाली आहे. एसआयआर अंतर्गत जिल्ह्यातील २५ लाख ४५ हजार ६७७ मतदारांना गणनापत्रक वाटप करण्यात आले. त्यानुसार १ लाख ८ हजार मयत मतदार, १५ हजार ३०७ गैरहजर मतदार, १ लाख ५३ हजार ८३३ कायमस्वरूपी स्थलांतरित मतदार, १ हजार २ इतर मतदार आणि ५२ हजार १५० यापूर्वीच नोंदणी झालेले मतदार मतदारयादीतून वगळण्यात आले आहेत. जिल्ह्यातील एकही पात्र मतदार मतदानाच्या हक्कापासून वंचित राहणार नाही.



यासाठी सर्व नागरिक, राजकीय पक्षांचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी यांनी यादीचे अवलोकन करावे. पात्र मतदाराचे नाव पत्ता सापडला नसल्यास किंवा 'अनकलेक्टेड' वर्गवारीमध्ये समाविष्ट झाले असल्यास अथवा त्यांनी गणनापत्रक जमा केले नसल्यास, त्यांनी त्वरित संबंधित बीएलओशी संपर्क साधून गणनापत्रकात अचूक माहितीसह भरावी, तसेच गणना पत्रक जमा करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी येरेकर यांनी केले

# बोगस दिव्यांगांचा पर्दाफाश; नऊ कर्मचाऱ्यांवर एफआयआर

## रिकव्हरीचे आदेश; आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी दिली परवानगी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती-** महानगरपालिकेत मूळचे दिव्यांग नसतानाही केवळ बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे नोकरी लाटणाऱ्या ९ 'बोगस' दिव्यांग कर्मचाऱ्यांचे बिंग फुटले आहे. या सर्व नऊ कर्मचाऱ्यांवर थेट फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आणि त्यांच्या नियुक्तीपासून आतापर्यंतच्या पगाराची संपूर्ण वसुली करण्याची परवानगी महापालिका डॉ. मंगेश गोंदावले यांनी दिले आहेत. आयुक्तांच्या या धडक निर्णयामुळे महापालिका वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली असून आता सर्वांचे लक्ष सामान्य प्रशासन विभागाच्या पुढील कारवाईकडे लागले आहे.



याप्रकरणी तत्कालीन आयुक्त वर्षा लड्डा यांनी या कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती. मात्र लोकल राजकारण आडवे आले होते. मात्र शासनाच्या उपसचिवांनी बोगस कर्मचारी प्रकरणी कठोर भूमिका घेतल्यामुळे सामान्य प्रशासन विभाग आयुक्तांच्या परवानगीनंतर 'ईन ॲक्शन'मध्ये आला आहे.

शासकीय नियमांनुसार दिव्यांग कोट्याचा लाभ मिळण्यासाठी किमान ४० टक्के दिव्यांगत्व असणे बंधनकारक आहे. मात्र, महापालिकेच्या रडारवर आलेले 'ते' ९ कर्मचारी प्रत्यक्षात ४० टक्क्यांपेक्षा कमी दिव्यांग असल्याचे तपासणीत निष्पन्न झाले. सामान्य प्रशासनाने अंतिम चौकशी अहवाल सादर

९ बोगस दिव्यांग कर्मचारी प्रकरणी शासनाच्या निर्देशानुसार एफआयआर आणि रिकव्हरी करण्याची परवानगी आयुक्तांनी दिली आहे. त्याअनुषंगाने कार्यवाही करुन तसा अहवाल शासनाला पाठविला जाईल.

**- श्रीकांतसिंह चव्हाण, विधी अधिकारी**


सांध्य मराठी दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
अमरावती येथून प्रकाशित
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
धन्यवाद वाचकांनो!
25 लाख वाचकांनी
आमच्या साईड ला भेट दिल्याबद्दल
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
मुख्य पृष्ठ अमरावती विदर्भ महाराष्ट्र देश-विदेश
ब्रेकिंग न्यूज
अमरावतीत विकासकामांचा धडाका
पावसाचा जोर वाढला
शेतकऱ्यांसाठी महत्वाची बातमी
राज्यातील राजकीय घडामोडी
क्रीडा क्षेत्रातील ताज्या बातम्या
HTTPS://E PAPER.VIDARBHAPRAJASATTAK.COM
आपल्या परिसरातील बातम्या व राज्यभरातील ताज्या घडामोडी
वाचा आता आमच्या सोबत
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
आमच्या चॅनल ला आजच जॉईन व्हा!
स्थानिक बातम्यांवर विशेष भर
राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व कृषी बातम्या
फोटो व व्हिडिओ सह अपडेट
तत्काळ व विश्वसनीय बातम्या
मो. 8605948853
Follow Us On :